## <u>विशेष दिवाणी दावा क्रमांक ३२/२००७ मधील नि.क्र.२३३ वरील आदेश</u>
## <u>CNR No.MHSN050014452007</u>

१. वादी यांनी प्रस्तुत अर्ज प्रतिवादी क्र.२ यांचे वारस दाव्यात समाविष्ठ करण्याची परवानगी मिळण्याबाबत दाखल केलेला आहे.

२. वादी यांच्या म्हणण्यानुसार, प्रतिवादी क्र.२ सौ. दिपा दिलीपराव शिंदे (गवळी) या दिनांक १८.०७.२०२२ रोजी कोल्हापूर येथे मयत झालेल्या आहेत. परंतु प्रतिवादीतर्फे त्या मयत असल्याची कोणतीही सुचना अथवा पुरसिस रेकॉर्डवर ठेवलेली नाही. त्यामुळे वादींना त्याची माहीती मिळाली नसल्यामुळे मयताचे वारस रेकॉर्डवर आणण्याबाबत पुर्तता करता आली नाही. प्रतिवादी क्र.२ यांचे वारस प्रतिवादी क्र.१अ नेहा प्रसाद आपटे व प्रतिवादी क्र.३ ऋषीकेश दिलीपराव शिंदे हे अगोदरपासूनच दाव्याच्या कामी सामील आहेत. तथापी तांत्रीक अडचण राहु नये म्हणून वादी यांचा प्रस्तुत अर्ज मंजूर करण्यात यावा व त्याप्रमाणे दुरुस्ती करण्याबाबत आदेश होण्यास विनंती केली आहे.

३. प्रस्तुत अर्जाला अनुषंगून प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्जावर त्यांचे म्हणणे दाखल केलेले आहे. प्रतिवादी यांच्या म्हणण्यानुसार वादी व प्रतिवादी क्र.२ हे एकमेकांचे नातेवाईक आहेत. प्रतिवादी क्र.२ मयत झाल्याचे समजले नाही असे चुकीचे कथन करुन अर्ज दिला आहे. वारस रेकॉर्डवर घेण्यास झालेल्या विलंबाबाबत वादी यांनी सबळ कारण दिलेले नाही. करीता वादीचा अर्ज २०००/- रुपये खर्च बसवून नामंजूर करण्यात यावा.

४. अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले.

५. वादी यांनी प्रस्तुत दावा घोषणा व मनाई हुकूमाकरीता दाखल केलेला

आहे. प्रतिवादी क्र.२ सौ. दिपा दिलीपराव शिंदे दिनांक १८.०७.२०२२ रोजी मरण पावलेल्या आहेत ही बाब नि.क्र.२२८ वर दाखल केलेल्या त्यांच्या मृत्यू दाखल्यावरुन दिसून येते. वादी यांच्या कथनानुसार प्रतिवादी क्र.२ यांचे प्रतिनिधी सुरुवातीपासूनच दाव्यामध्ये प्रतिवादी क्र.१अ व प्रतिवादी क्र.३ म्हणून नमूद आहेत. वादी यांनी दिलेला नि.क्र.२२९ वरील विलंब माफीचा अर्ज व नि.क्र.२३१ वरील अबेटमेंट रद्द करण्याचा अर्ज मंजूर करण्यात आलेला आहे. मयत प्रतिवादी क्र.२ चे प्रतिनिधी यांना दाव्यात समाविष्ठ न केल्यास त्याचा दाव्याच्या अंतिम आदेशावर विपरीत परिणाम होवून दावा अर्थहीन होण्याची व कार्यवाहीचे बाहुल्याची शक्यता नाकारता येत नाही. उलटपक्षी सदर प्रतिवादीचे प्रतिनिधींना दाव्यात समाविष्ठ केल्यास वाद मुद्दयाचे अंतिमतः निराकरण होवू शकते.  त्यामुळे प्रस्तुत दाव्याचा निकाल गुणदोषावर होण्याकरीता वादी यांना प्रतिवादी क्र.२ यांचे प्रतिनिधी दाव्यात समाविष्ठ करण्याची संधी देणे योग्य ठरेल. त्यामुळे प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. या सर्व बाबींचा विचार करता, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज नि.क्र.२३३ मंजूर करण्यात येत आहे.

२. वादी यांना प्रतिवादी क्र.२ यांच्या नावापुढे मयत असे लिहून त्यांचे प्रतिनिधी प्रतिवादी क्र.१अ व प्रतिवादी क्र.३ हे दाव्यामध्ये असल्याचे नमूद करण्यास परवानगी देण्यात येते.

३. वादी यांनी अर्जात नमूद केल्याप्रमाणे १४ दिवसाच्या आत मयत प्रतिवादी क्र.२ यांच्या वारसाना दाव्यात समाविष्ट करुन तशी निशाणी १ मध्ये दुरुस्ती करावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by
MUKUL MADHUSUDAN
CHITALE
Date: 2024.07.22
18:09:05 +0530

इस्लामपूर.
**(मुकुल म. चितळे)**

दिनांक–१५.०७.२०२४
दुसरे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर, इस्लामपूर.

**<u>प्र मा ण प त्र</u>**

मी खात्रीपुर्वक सांगतो की, सदरहु पी. डी. एफ. फाईलमधील सर्व मजकूर मुळ आदेशाप्रमाणे शब्द नि शब्द बरोबर आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | - | सतिश कृष्णा पाटील, |
| कोर्टाचे नाव | - | दुसरे सह दिवाणी न्यायालय व. स्तर, इस्लामपूर. |
| आदेश घोषीत दिनांक | - | १५.०७.२०२४ |
| पी.डी.एफ/अपलोडचा दिनांक- | | २२.०७.२०२४ |